महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## कॉटन मार्केट स्टेशन येथून आज पासून प्रवासी सेवा सुरु











नागपूर 21/09/23 :  नागपूर : नागपूर मेट्रो रेल प्रकल्पानांतर्गत कॉटन मार्केट मेट्रो स्टेशन आज पासून प्रवासी सेवा करता सुरु झाले असून पहिल्या प्रवाशांचे महा मेट्रो द्वारा स्वागत करण्यात आले.आता ३७ मेट्रो स्टेशन येथून सकाळी ६ ते रात्री १० वाजता पर्यंत मेट्रो सेवा सुरु असून या स्टेशवरुन प्रवासी सेवा सुरू झाल्याने आता बाजारपेठ परिसरात जाणे सोपे झाले असून ताज्या

भाज्या आणि फळे घेण्यासाठी येण्या-जाण्याचा त्रास होणार नाही आहे मत मेट्रो प्रवाश्यानी व्यक्त केले.

कॉटन मार्केट मेट्रो स्टेशन हे शहरातील सर्वात जुन्या मार्केट परिसराच्या मध्यभागी आहे. या स्टेशन परिसरात थोक व चिल्लर भाजी करीता कॉटन मार्केट,  फळबाजार, मॉल, भंगार बाजार, इलेक्ट्रॉनिक मार्केट, खते-बियाणे, कीटकनाशक साहित्य मार्केट, एमपी बस स्थानक, एस.टी बस स्टँड, खाजगी बस स्टँड, लॉज, ऊस मार्केट, पान मार्केट, खोवा मार्केट, पूजा समग्री, पट्टल डोना इत्यादी वस्तूंचा बाजार संलग्न आहे. कॉटन मार्केट मेट्रो स्टेशनला जोडलेल्या मार्केटमध्ये दररोज शहरातील हजारो रहिवासी आणि गावाबाहेरील लोक विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी करण्या करिता येत असतात.

- मेट्रोने प्रवास सुकर झाला

रायपूरचे रहिवासी रवी केसरवानी आणि त्यांचा मित्र जयेश अरोरा, जे लोकमान्य नगर येथून कॉटन मार्केट स्टेशनवर एम्प्रेस सिटी मॉलला जाण्यासाठी पोहोचले, त्यांनी सांगितले की मेट्रोने प्रवास करणे किफायतशीर आणि सोपे झाले आहे.

- व्यापारात होणार वाढ

स्टेशनला जवळ असलेले पत्राळी दुकानदार बंडू पत्तलवाले ने सांगितले कि, सदर स्टेशन सुरु झाल्याने व्यवसायात वाढ होईल,शहराच्या चारही भागाचे नागरिक या ठिकाणी सहज पाने येऊ शकतील, धरमपेठ येथील रहिवासी चेतना भोजनालयचे संचालक हितेश त्रिवेदी ताज्या भाज्या घेण्या करता आज मेट्रोने या ठिकाणी आले होते त्यांनी सांगितले कि आज पासून मेट्रो सेवा सुरु झाल्याचा आम्हाला आनंद आणि फायदेशीर आहे.

फुले मार्केटमध्ये डेप्युटी सिग्नल, दुर्गावती नगर, प्रजापती नगर, पारडी, बगाडगंज , कळमना आदी भागातील मजूर मोठ्या संख्येने मजदुरी करता येत असतात. कॉटन मार्केट मेट्रो स्टेशन सुरू झाल्यामुळे नोकरदार वर्गाला फायदा होणार आहे. मेट्रो सेवा किफायतशीर आणि सुरक्षित असण्यासोबतच नोकरदार वर्गाचा वेळ आणि पैसा वाचविण्यातही उपयुक्त ठरेल असे मत फुले भाजी व फळ बाजारातील व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.